# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २२.०५.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**पाचपावली पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २२.०५.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, नवीन वस्ती, अफरोज किराणा स्टोर्सचे बाजुला, पाचपावली, नागपूर येथे राहणारा मोहम्मद आबिद कुरेशी वल्द मोहम्मद असलम कुरेशी वय २७ वर्ष याचे राहते घरी गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे १२ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपणे व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. नमुद जनावरांचा मालकाबाबत माहिती काढली असता, जनावरे हे घरमालक मोहम्मद आबिद कुरेशी यांची असल्याचे समजले. आरोपी याने गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण १२ गोवंशीय जनावरे व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे २,००,४००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे पाचपावली येथे पोहवा इमरान शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरूध्द कलम ५,५(ब),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११ प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग), वपोनि. अनिरुध्द पुरी यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. राजेंद्र जाधव, रंजीत माजगावकर, पोहवा इमरान शेख, प्रविण वावरकर, ज्ञानेश्वर भोगे, रोमेश मेनेवार, पोअं. गगन यादव व संतोष केंद्रे यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे पाचपावली :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २०.०५.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक २२.०५.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, गली क्र. ३, लष्करीबाग, नागपूर येथे वरचे माळयावर राहणाऱ्या फिर्यादीच्या आजी नामे सौ. इंदुबाई किशोर चव्हाण वय ६५ वर्ष यांचे राहते घरी कोणीतरी अज्ञात आरोपीने प्रवेश करुन अज्ञात कारणावरुन त्यांचे गळयावर धारदार शस्त्राने वार करुन त्यांना जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी निरज यशवंत मेश्राम वय २७ वर्ष रा. प्लॉट क्र. ११७ ए, भारत टाऊन, न्यु येरखेडा, कामठी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि अक्षय थोपटे

८५३०८४७९७० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम १०३ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे वाडी :–** दिनांक २२.०५.२०२६ चे १२.१५ वा. चे सुमारास पोलीस ठाणे वाडी हद्दीत वडधामणा दर्गाह जवळ एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० वर्ष वयाचे, दाढी वाढलेली, गळयात हिरव्या रंगाची मण्यांची माळ, अंगात मळकट पांढरा शर्ट व मळकट जिन्स पॅन्ट घातलेल्या वर्णनाचे, बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. मृतक इसम हे ०२ महिन्यापासून दर्गाह परिसरात भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत असल्याचे समजले आहे.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे वाडी येथे सपोनि. साईनाथ केंद्रे ९९७५५८०२२२ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :–** दिनांक २१.०५.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत कामठी रोड, रेल्वे क्वॉर्टरचे समोरील मेट्रो पोल क्र. ५१ ते ५२ चे मधात डिव्हायडरला लागून एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष वयाचे, रंग–सावळा, चेहरा–गोल, डोक्याचे केस–काळे, पांढरे व वाढलेले, दाढी मिशी–वाढलेली, अंगात फुलबाहीचे लाल निळे रंगाचे टि–शर्ट व आकाशी रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेल्या वर्णनाचे, बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि देवचंद सहारे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सक्करदरा :–** शेखर राजकुमार मदनकर वय २९ वर्षे, रा. प्लॉट क्र. २२८, जयंती नगरी, नागपूर हे दिनांक ०६.०५.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत संतोष पकोडेवाला, तिरंगा चौक येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन**– रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची– ५ फुट २ इंच, अंगात पांढरी टिशर्ट, काळी फुलपॅन्ट घातलेली आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. **ओळख– डावे हातावर इंग्रजीत शेखर गोंदलेले आहे.**

**२) पोलीस ठाणे नंदनवन :–** संजय मोतिराम चांदेकर वय ४५ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, गली क्र. ११, केडीके कॉलेज जवळ, नागपूर हे दिनांक ०५.०५.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन**– रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची– ५ फुट ६ इंच, अंगात निळी टिशर्ट, निळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. **ओळख– डावे हातावर दिल चे चिन्ह त्यामध्ये इंग्रजीत एस गोंदलेले आहे.**

**३) पोलीस ठाणे सक्करदरा :–** सौ. सुरेखा स्वप्निल शिंगणापुरे वय ३७ वर्षे, रा. रघुजी नगर, क्वॉर्टर क्र. ३६२/८/४४, सक्करदरा, नागपूर ह्या दिनांक १९.०५.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरी कामाला जाते असे म्हणून कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन**– रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची– ५ फुट ३

इंच, अंगात– पांढरा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात. ओळखचिन्ह–उजवे पायाची करंगळी लहान आहे.

**<u>४) पोलीस ठाणे नंदनवन</u> :–** राहुल परमानंद चव्हाण वय २९ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, खोब्रागडेचे घरी किरायाने, नागपूर हे दिनांक १२.०५.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी दुकानातून खर्रा घेऊन येतो असे सांगून कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>**– रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, अंगात क्रिम रंगाचा फुलशर्ट, व फुल बरमुडा पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. **<u>ओळख– उजवे हाताचे दंडावर आई असे गोंदलेले आहे. सोबत दुचाकी क्र. एमएच ४९ सीयु ३९९३ घेऊन गेला आहे.</u>**






शेखर संजय सौ. सुरेखा राहुल

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१००३८ /२००१ | कलम ३२४ भा.दं.वि. | रामजी काशिनाथ शाहू रा. सुभाष नगर, कामगार कॉलनी, प्रतापनगर नागपुर | २८.०५.२०२६ |
| २ | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००१९९/ २००१ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | राजू बुटऱ्या उर्फ राजेश गणेश गवळी रा. सुभाष नगर, माता मंदीर मागे, प्रतापनगर, नागपुर | २८.०५.२०२६ |
| ३ | मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ८, नागपूर | अप.क्र. ६९७/ २०२४ | कलम ४०६,४२०,३४ भादंवि | अक्षय मनोज खोब्रागडे वय २९ वर्ष रा. म्हाळगी नगर, घर क्र. ८३१, एनआयटी क्वॉर्टर्स, नरसाळा रोड, गजानन मंदीरमागे, हुडकेश्वर नागपूर | २५.०५.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उपनिरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**

# <u>प्रेस नोट</u>

## <u>नागरी हक्क संरक्षण, नागपूर शहर अंतर्गत कार्यशाळा संपन्न :</u>

मा. अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्गदर्शनात नागरी हक्क संरक्षण, नागपूर परिक्षेत्र, नागपूर अंतर्गत अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ व सुधारणा अधिनियम २०१५ च्या प्रसिध्दी, जनजागृती, प्रभावी अंमलबजावणी व गुणवत्तापूर्ण तपासकामी कार्यशाळा नागरी हक्क संरक्षण विभाग मार्फतीने दि.२२/०५/२०२६ (शुकवार) रोजी ऑडीटोरीयम हॉल येथे घेण्यात आली. सर्वप्रथम मान्यवरांचे उपस्थितीत पोलीस आयुक्त कार्यालयातील पोलीस भवन, मधील सभागृह येथे दिप प्रज्वलीत करुन व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पण करुन पोलीस कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली.

सदर कार्यक्रमांत प्रमुख पाहुणे **श्री. रविन्द्रकुमार सिंगल**, पोलीस आयुक्त, तसेच **श्री. शिवाजी राठोड**, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, नागपूर शहर, वक्ते **मा.श्री.अनिल वाळके,** सहायक प्रकल्प व्यवस्थापक, बार्टी, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी बार्टीच्या कामकाजाबाबत, योजना व समाज कल्याण च्या विविध योजनांची माहिती दिली. **मा.ॲड फिरदोस मिर्झा,** जेष्ठ अधिवक्ता, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर, महत्वाचे न्यायनिर्णय व कायद्याची माहिती व अंमलबजावणी तसेच ॲट्रासिटी, मॅन्युअल स्कॅव्हेंजर कायदयाची माहिती दिली. तसेच **मा. श्री. एन. डी. इंगोले,** सेवानिवृत्त सहायक पोलीस आयुक्त यांनी तपासातील उणिवा कशा दुर करायच्या व आरोपीचे दोषसिध्दीचे प्रमाण वाढवण्याबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेत अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ व सुधारणा अधिनियम २०१५ च्या प्रसिध्दी, जनजागृती, प्रभावी अंमलबजावणी व गुणवत्तापूर्ण तपासकामी पोलीस कार्यशाळेत १० सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधिक्षक, पोलीस निरीक्षक, सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, व सहा. पोलीस उपनिरीक्षक व तपासी अंमलदार असे एकुण १२० पोलीस अधिकारी/पोलीस अंमलदार यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यशाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, नागपूर तसेच समाज कल्याण विभाग, नागपूर येथील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळा मा. श्री. लक्ष्मीकांत पाटील, पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, अति. कार्य. नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे मार्गदर्शनात श्री.बद्रीनारायण तांबे, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षक नागपूर शहर यांनी आयोजीत केली. पथक प्रमुख सपोनि श्रीमती योगीता श्रीखंडे यांनी सुत्रसंचालन केले. तसेच नागरी हक्क संरक्षण विभागातील सपोनि श्रीमती मृणालीनी वंजारी, नागपूर ग्रामीण पथक प्रमुख तसेच पोलीस उप निरीक्षक श्री.महेंद्र सरपटे, पोलीस अंमलदार श्री.दर्शन मिसाळ, श्री.रवि राउत, श्री.राजेश जवादे, श्री.गजानन माथने, श्री.मधुकर टेकरे, श्री.विजय डोंगरे, श्री.नंदकिशोर सिडाम, श्री.देवनारायण तिवारी, श्री.ध्रुवकुमार राय, श्रीमती जया लोखंडे, श्रीमती शालीनी बुटले, श्रीमती कविता येउतकर, श्रीमती प्रिती मुदगलकर, श्रीमती योगीता खापेकर, श्रीमती कल्पना बंसोड यांनी सदर कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. श्रीमती जया लोखंडे यांनी उपस्थित मान्यवर, पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे आभार व्यक्त केले.



